# लोक महाविद्यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## <u>अहवाल सत्र 2018-19</u>

सन 2018-19 या शैक्षणिक सत्रामध्ये लोक महाविद्यालय, वर्धा येथे समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची बैठक दिनांक 07/09/2018 ला आयोजीत करुन समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून महेश चिल्लुरकर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या बैठकीकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. सौ. पुष्पा तायडे मॅडम यांचे महत्वाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. याप्रसंगी समाजशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.मोहन पाठक, प्रा. डेहणे मॅडम, प्रा.उमाटे मॅडम उपस्थित होते.

समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने दिनांक 6 डिसेंबर ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते प्रा.पाटणे सर यांनी आपल्या मार्गदर्शनातून डॉ.बाबासाहेबांच्या विचारावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी डॉ.बेताल सर यांनी व्यक्तीपुजा माणसाला किती घातक ठरते, त्यापेक्षा विचारांची पुजा केली पाहिजे. हे डॉ.बाबासाहेबांचे विचार आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले. त्यानंतर प्रा.डॉ.सुरकार सर यांनी डॉ.बाबासाहेबांबाबत शिक्षणाने माणूस समृध्द होतो असे विचार व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.सौ.पुष्पा तायडे मॅडम यांनी डॉ.बाबासाहेबांच्या तत्वज्ञानाबाबत विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी 26 जानेवारी 2019 ला प्रजासत्ताक दिनानिमित्य नालवाडी वर्धा येथील श्रीछाया अनाथालय ला भेट दिली. भेटी दरम्यान अनाथालयामध्ये असलेल्या अनाथ बालकांशी हितगुज करण्याची संधी समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना मिळाली. त्यामुळे अनाथ बालकांच्या समस्यांची जाणिव विद्यार्थ्यांना या भेटीतुन झाली. भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी अनाथ मुलांना स्नेहाची भेट म्हणुन पिण्याच्या पाण्याची बॉटल दिली. भेटीमध्ये समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी ‘गावाकडे चला’ या उपक्रमातंर्गत गणेशपुर या गावाला भेट दिली. गाव भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी गावात प्रभात फेरी व कुटूंबाच्या भेटी घेऊन गावांच्या समस्या जाणुन घेतल्या व अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. भेटीमध्ये समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

महाविद्यालयाव्दारे आयोजीत सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी वेगवेगळया सामाजिक प्रश्नांवर पथनाटय सादर करुन विद्यार्थ्यांमध्ये जाणिवजागृती निर्माण केली.

अभ्यासक्रमाचा महत्वाचा भाग म्हणुन समाजशास्त्राच्या पदव्यूत्तर विद्यार्थ्यांचे सेमीनार आयोजीत करण्यात आले. त्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.पुष्पा तायडे मॅडम आणि समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक वर्ग यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

वरील सर्व उपक्रमाकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.पुष्पा तायडे मॅडम, समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. पाठक, प्रा. डेहणे मॅडम, प्रा.उमाटे मॅडम आणि इतर सर्व प्राध्यापकांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

प्रा. जयश्री डेहणे
समाजशास्त्र विभाग,
लोक महाविद्यालय, वर्धा